खाजगीकरणामार्फत हाती
घ्यावयाच्या ३ मे.वॅ. स्थापित
क्षमतेपर्यंतच्या जलविद्युत
प्रकल्पासाठी संकल्पचित्र
तपासणी फी आकारण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
शासन निर्णय क्रमांक: पीव्हीटी-२००१/(२९२/२००१)/ज.वि.
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक: २६.११.२००१

प्रस्तावना:

खाजगीकरणातून हाती घ्यावयाच्या ३ मे.वॅ. स्थापित क्षमतेपर्यंतच्या जलविद्युत प्रकल्पाच्या बाबतीत प्रवर्तकाने तयार केलेले प्रकल्पांचे संकल्पन व आराखडे, रेखाचित्रे इ.स पाटबंधारे विभागाकडून मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदर संकल्पन व आराखडे, रेखाचित्रे इत्यादींची तपासणी करुन मंजूरी देण्यासाठी पाटबंधारे विभागातर्फे संबंधीत प्रवर्तकाकडून तपासणी शुल्क आकारणी बाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

निर्णय :

१) ३ मे.वॅ. स्थापित क्षमतेपर्यंतचे जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून हाती घेताना प्रवर्तकाकडून संकल्पचित्रांच्या तपासणीपोटी स्थापित क्षमतेवर आधारित खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात यावे.
   १) १ मे.वॅ. स्थापित क्षमतेपर्यंत रुपये २ लक्ष
   २) १ मे.वॅ.हून अधिक ते २ मे.वॅ.पर्यंत रुपये ३.५ लक्ष
   ३) २ मे.वॅ.हून अधिक ते ३ मे.वॅ.पर्यंत रुपये ५ लक्ष

२) वरीलप्रमाणे मिळणा-या तपासणी शुल्काची एकूण रक्कम स्थापत्य व विद्युत विभागामध्ये वाटणी अनुक्रमे ७५ टक्के व २५ टक्के या प्रमाणात करण्यात यावी.

३) प्रवर्तकाने सर्व संकल्पन व आराखडे, रेखाचित्रे तपासणीसाठी प्रथम संबंधीत अधीक्षक अभियंता (विद्युत व यांत्रिकी) यांच्याकडे तपासणी शुल्कासह द्यावे. विहीत तपासणी शुल्क प्राप्त झाल्यावर अधीक्षक अभियंता (विवयां) यांनी स्थापत्य कामासंबंधीचे संकल्पन, आराखडे इ. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्याकडे तपासणी व मंजूरीसाठी पाठवावे व या विषयाचा समन्वय साधून एकत्रित मान्यता प्रवर्तकास द्यावी.

४) हा निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ११०/व्यय १२, दिनांक २८.१०.२००१ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र.पु.जोशी)
शासनाचे अवर सचिव

५. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने प्रस्तावित केलेल्या आराखडयास संबंधित क्षेत्रिय मुख्य अभियंत्यांनी मान्यता द्यावी. मान्यता देतांना यांत्रिकी कामासाठी मुख्य अभियंता (यांत्रिकी) व विद्युत कामासाठी मुख्य अभियंता (विद्युत) यांची सहमती घ्यावी.

६. वरील प्रमाणे मंजूरी घेण्यांत आलेल्या आराखडयानुसार अंदाजपत्रक तयार करावे.

७. मंजूर अंदाजपत्रकामध्ये यांत्रिकी कामाच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता (यांत्रिकी ) व विद्युत कामाच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता (विद्युत) यांची सहमती आवश्यक राहील.

८. मंजूर अंदाजपत्रकाच्या आधारे, निधीच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या कार्यक्रमानुसार व प्रचलित नियमानुसार निविदा निश्चितीची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(भ. तु. रेडकर),
शासनाचे उपसचिव

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
सर्व कार्यकारी संचालक / सर्व मुख्य अभियंता

प्रत : मोप्र-१ कार्यासन (संग्रहार्थ)

D:\Joshi\Gosavi.doc\LIS Govt. G. R..doc